आरोग्य अधिकारी कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र. :- एच.ओ/ ५३७
दिनांक :- २७/०५/२०२६

मा.सर्व खातेप्रमुख / विभागप्रमुख,
मा. उप आयुक्त ( झोन क्र ०१ ते ०५ )
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस...

विषय :- मे.जय शंकर असोसिएट्स, ४०८, ४ था मजला सातारा रोड, पंचमी हॉटेल जवळ पर्वती पुणे ४११००९ मोबाईल क्र. ८८८८३६८८८८ या ठेकेदाराचे नाव १ वर्ष करिता पुणे मनपाचे काळया यादीत समाविष्ठ करणेबाबत.

संदर्भ :- मा.अति.महा.आयुक्त ( ज ) ठराव क्र. ८/१७ दि.२१/०४/२०२६.

महोदय,

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत, निविदा क्र. PMC/HEALTH/2025-26/03 अन्वये पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टचे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित कमला नेहरू रूग्णालयाकरिता आवश्यक तांत्रिक / अतांत्रिक संवर्गातील अधिकारी कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये मे. जय शंकर असोसिएट्स, ४०८, ४ था मजला, सातारा रोड, पंचमी हॉटेल जवळ, पर्वती, पुणे – ४११००९ यांनी सादर केलेल्या निविदेमध्ये खोटी / भ्रामक कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे, संदर्भीय ठरावान्वये मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त ( जनरल ) यांची मान्यता घेऊन, संबंधित ठेकेदाराचे नाव पुणे महानगरपालिकेच्या काळया यादीत ( Black List ) समाविष्ट करण्यात आले आहे.

तरी, सर्व विभागप्रमुखांनी याची नोंद घ्यावी व मे. जय शंकर असोसिएट्स यांना संदर्भीय ठरावाच्या दिनांकापासून पुढील १ ( एक ) वर्षांच्या कालावधीत पुणे महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामार्फत कोणत्याही प्रकारचे नवीन काम/नियुक्ती देऊ नये, याची दक्षता घ्यावी.

( डॉ.निना बोराडे )
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :-
१) मा.महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ( ज / ई / वि ),
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव सादर...